Goadoot ( Friday, 27th July 2018) pg. 7

# डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी गट उतरले प्रत्यक्ष शेतात

सांगे, दि. २६ (प्रतिनिधी)

कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कृषिक्षेत्राचा व खास करून ग्रामीण भागातील कार्यानुभव यावा म्हणून डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाचे विविध विद्यार्थी गट ग्रामीण भागात पुढील पाच महिने स्थानिक शेतकऱ्यांत मिसळून शेती ज्ञानाचे आदान-प्रदान करणार आहे. त्यापैकीच एक गट मळकर्णे येथे कार्यानुभव घेत आहे.

कुशावती पीस्टन या कृषी गटाच्या मुलांनी मळकर्णे येथील सरकारी हायस्कुलात कार्यक्रम आयोजित केला होता. यात डॉ. राजेश कवळे, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. राजन शेळके यांनी मुलांना मार्गदर्शन केले. या कृषिदिनाच्या निमित्ताने मुलांनी गावात 'झाडे वाचवा' हा संदेश देत प्रभात फेरी काढली. मुख्याध्यापिका सिंधू प्रभूदेसाई यांनी आभार मानले.

दुसऱ्या एका कार्यक्रमात याच कृषी विद्यार्थ्यांनी गावात पीक लागवडीच्या पद्धती, खतांचे व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, माती परीक्षण, नवीन बियाणे, कीड व रोग नियंत्रण, गांडूळ खत, अळंबी तयार करणे, सामाजिक उपक्रमात रक्तदान शिबिर, वृक्ष लागवड अशा कार्यातून अनुभव घेणार आहे.



***➲ मळकर्णे येथे कृषिदिन कार्यक्रमात सहभागी कृषी विद्यार्थी व हायस्कूलचे शिक्षक.*** *(छाया : मनोदय फडते)*